पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@mahapolice.gov.in
☎ : 07172-264300, 📠: 07172-255800 ✍: 7447744100 (PRO)

## पोलीस वार्तापत्र

# अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कारवाई : स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर ची कामगिरी

चंद्रपूर जिल्हयातील अवैध धंदे आणि गौण खनिजांच्या चोरट्या वाहतुकीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि पोलीस प्रशासनाने आपली धडक मोहीम तीव्र केली आहे. दिनांक २० मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर च्या मूल पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे पाथरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अंतरगाव नाला परिसरात एका मोठ्या अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीवर यशस्वी छापा टाकला. या कारवाईत ६,०५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या छाप्यात एक संशयित ट्रॅक्टर विना क्रमांकाच्या ट्रॉलीसह रेतीची अवैध वाहतूक करताना मिळून आला. पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, सदर रेती उत्खनन व वाहतुकीबाबत कोणताही वैध परवाना किंवा कागदपत्रे आढळून आली नाहीत, म्हणुन अनिल मनोहर राऊत (वय ३६ वर्षे) रा. पाथरी, ता. सावली, जिल्हा - चंद्रपूर).

<u>जप्त करण्यात आलेला मुद्देमाल</u>:

१) ट्रॅक्टर व ट्रॉली: एक विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली (किंमत अंदाजे ६ए००ए०००/- रुपये)

२) गौण खनिज: १ ब्रास रेती (किंमत अंदाजे ५ए०००/- रुपये)

एकूण जप्त मुद्देमाल किंमत: ६,०५,०००/- रुपये (अक्षरी सहा लाख पाच हजार रुपये).

या प्रकरणी आरोपी अनिल मनोहर राऊत याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन पाथरी येथे अपराध क्रमांक १०२/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (BNS), सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, आणि सहकलम १७७ मोटार वाहन कायदा (M.V. Act) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणीए अपर पोलीस अधीक्षक श्री ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनातए पोलीस निरीक्षक श्री अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथील मुल पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.